पुढारी

# शिंदे महाविद्यालयात 'हॅम रेडिओ ऑपरेशन' प्रशिक्षण

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

भडगाव (ता. गडहिंग्लज) येथील डॉ. ए. डी. शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालय इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्प्युटर सायन्स विभागाच्या वतीने 'हॅम रेडिओ ऑपरेशन' या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन केले होते. प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांनी स्वागत केले.

माजी भारतीय नौदल अधिकारी बसाप्पा आरबोळे यांनी विद्यार्थ्यांना हॅम रेडिओचे मूलतत्त्व, फ्रिक्वेन्सी निवड, सिग्नल ट्रान्समिशन आणि रेडिओ कम्युनिकेशन शिस्त याविषयी मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. घेवडे यांनी भाषणात विद्यार्थ्यांनी नव्या तंत्रज्ञानाची ओळख करून देत समाजोपयोगी उपक्रमामध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. संस्थाध्यक्षा ऊर्मिलादेवी शिंदे, सचिव प्रा. स्वाती कोरी, सल्लागार महेश कोरी, प्रा. महादेव बंदी यांचे सहकार्य मिळाले. कार्यशाळेत ९२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रा. इरफान त्रासगर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. श्वेता भोई यांनी आभार मानले.



**भडगाव : येथील शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालयात मान्यवरांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे.**

My Kolhapur Edition
Nov 12, 2025 Page No. 09
Powered by: erelego.com

# शिंदे अभियांत्रिकीत हॅम रेडिओ ऑपरेशन प्रशिक्षण कार्यशाळा

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

भडगाव (ता. गडहिंग्लज) येथील डॉ. ए. डी. शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्प्युटर सायन्स विभागाच्या वतीने 'हॅम रेडिओ ऑपरेशन' या विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांना हॅम रेडिओच्या कार्यपद्धतीची ओळख करून देणे व आपत्ती व्यवस्थापन, तसेच समाजसेवेत या तंत्रज्ञानाचा उपयोग समजावून सांगणे हा होता.



भडगाव : बसाप्पा आरबोळे यांचे स्वागत करताना डॉ. डी. व्ही. घेवडे.

प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांनी स्वागत केले. यावेळी माजी भारतीय नौदल अधिकारी बसाप्पा आरबोळे यांनी विद्यार्थ्यांना हॅम रेडिओचे मूलतत्त्व, फ्रिक्वेन्सी निवड, सिग्नल ट्रान्समिशन आणि रेडिओ कम्युनिकेशन शिस्त याविषयी मार्गदर्शन केले. तसेच हॅम रेडिओ आपत्तीच्या काळात प्रभावी संपर्क साधन म्हणून कसे उपयोगी पडते, याबद्दल त्यांनी प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे माहिती दिली.

प्राचार्य घेवडे यांनी विद्यार्थ्यांनी नव्या तंत्रज्ञानाची ओळख करून देत समाजोपयोगी उपक्रमामध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उपकरणं हाताळण्याची आणि संवाद प्रात्यक्षिक पाहण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांनी तांत्रिक कौशल्यासोबतच समाजसेवेचे महत्त्वही जाणले. कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रा. इरफान त्रासगर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. श्वेता भोई यांनी आभार मानले. संस्थाध्यक्षा उर्मिलादेवी शिंदे, सचिव प्रा. स्वाती कोरी, सल्लागार महेश कोरी, प्रा. महादेव बंदी यांचे सहकार्य मिळाले.